| MHSO140000932020 | दाखल दिनांकः | ०९/०१/२०२० | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांकः | ०९/०१/२०२० | | |
| | निकाल दिनांकः | ११/०५/२०२६ | | |
| | कालावधीः | व. | म. | दि. |
| | | ०६ | ०४ | ०२ |

**निशाणी क्र.४२**

**भाग 'अ'**

| **बार्शी येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग कोर्ट नं.१ यांचे न्यायालयात**<br>**( पिठासीन अधिकारी श्रीमती पी.व्ही. राऊत )** | | |
|---|---|---|
| केस नंबर | :- | **नियमित फौज. खटला क्र. ३१/२०२०** |
| अपराध क्रमांक व पोलीस स्टेशन | :- | गु.र.नं. ७८५/२०१९<br>बार्शी शहर पोलीस स्टेशन, बार्शी,<br>ता.बार्शी जि.सोलापूर. |
| **फिर्यादी** | **:-** | **महाराष्ट्र सरकार**<br>**तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,**<br>**बार्शी शहर पोलीस स्टेशन, बार्शी,**<br>**ता.बार्शी जि.सोलापूर.** |
| **फिर्यादीतर्फे वकील** | :- | श्री. ए.बी. क्षिरसागर, सहाय्यक सरकारी वकील |
| **आरोपी** | :- | **१) गुणवंत सुरेश पवार,**<br>वयः- ४२ वर्षे, धंदाः- मजुरी,<br>रा. चिखली, ता.मोहोळ, जि.सोलापूर.<br><br>**३) उमेश प्रकाश काळे (फौज.प्र.सं.क.२९९ प्रमाणे)** |
| **आरोपीतर्फे वकील** | :- | श्री. आर.बी. बायस |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | ०५/१०/२०१९ रोजी रात्री ११.३० ते दिनांक ०६/१०/२०१९ रोजी पहाटे ०३.०० च्या दरम्यान |
| प्रथम खबर दिल्याची तारीख | ०६/१०/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | ०९/०१/२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | १९/१२/२०२२ |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | १४/०३/२०२३ |
| खटला न्यायनिर्णयासाठी निश्चित केल्याची तारीख | ०५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११/०५/२०२६ |
| शिक्षेचा आदेश असल्यास, | -- |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपीचा दर्जा | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटकेची तारीख | दोषारोपाचे कलम | आरोपीची निर्दोष सुटका झाली कि आरोपीला शिक्षा झाली. | आरोपीची शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेल्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | गुणवंत सुरेश पवार | ०८/१०/२०१९ | ०५/०२/२०२० | भा.द.वि. कलम ४५७ व ३८० सह कलम ३४ अन्वये | आरोपीची निर्दोष मुक्ताता झाली. | -- | -- |

## भाग 'क'

### सरकारी साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/ न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

**अः- सरकारी साक्षीदारः-**

| दर्जा | साक्षीदाराचे नाव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | मोबिन असिफ बागवान (नि.क्र.१८) | फिर्यादी |
| सा.क्र.२ | नाजीया असिफ बागवान (नि.क्र.३०) | साक्षीदार |
| सा.क्र.३ | मुसा गुलाब बागवान (नि.क्र.३१) | साक्षीदार |
| सा.क्र.४ | महेबुब हमीद बागवान (नि.क्र.३२) | साक्षीदार |
| सा.क्र.५ | सद्दाम रऊफ बागवान (नि.क्र.३३) | साक्षीदार |
| सा.क्र.६ | मनोज महेश शेटे (नि.क्र.३७) | साक्षीदार |
| सा.क्र.७ | उमाकांत गजानन येवारे (नि.क्र.३८) | साक्षीदार |

**ब- बचाव पक्षाचे साक्षीदार :- नाही**

**क- न्यायालयातर्फे साक्षीदार :- नाही**

### सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी.

**अ. सरकार पक्षातर्फेः-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.१५ | चार्ज |
| २. | निशाणी क्र.१९ | फिर्याद<br>(सा.क्र.१ यांच्या पुराव्यातुन सिध्द) |
| ३. | निशाणी क्र.४० | आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये जबाब |

**ब. बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी क्र.२० | घटनास्थळ पंचनामा |

## क. न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः- निरंक

## ड. जप्त वस्तुंचे वर्णनः-

| अ.क्र. | वस्तुंचा नंबर | वस्तुंचे वर्णन |
|---|---|---|
| १. | पो.ठाणे.एम.आर. नं.१६९/२०१९ | १) एक सॅमसंग कंपनीचा A7 मॉडेलचा मोबाईल,<br>२) एक सॅमसंग कंपनीचा C5 मॉडेलचा मोबाईल,<br>३) एक रेडमी कंपनीचा नोट 7 प्रो मॉडेलचा मोबाईल,<br>४) एक सॅमसंग कंपनीचा J7 मॉडेलचा मोबाईल,<br>५) एक रेडमी नोट कंपनीचा 7S मॉडेलचा मोबाईल,<br>६) एक सॅमसंग कंपनीचा J2 मॉडेलचा मोबाईल,<br>७) एक सॅमसंग कंपनीचा J7 मॉडेलचा मोबाईल,<br>८) एक सॅमसंग कंपनीचा गुरु मॉडेलचा मोबाईल, |
| २. | पो.ठाणे.एम.आर. नं.१६९/२०१९ | एक पांढ-या रंगाची होंडा अमेझ कंपनीची चारचाकी गाडी जिचा नं.MH-42/AS-0080 |
| ३. | पो.ठाणे.एम.आर. नं.१७०/२०१९ | एक काळया रंगाची होंडा युनिकॉर्न कंपनीची मोटार सायकल जिचा नं.MH-13/CZ-9265 |

## :: न्यायनिर्णय ::

(निकाल दिनांक ११ मे, २०२६ रोजी घोषित.)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४५७ आणि ३८० सह कलम ३४ अन्वये सदरचे प्रकरण चालविले आहे.

**०२] अभियोग पक्षाचे म्हणणे थोडक्यात असे की** :-

फिर्यादी मोबीन आसिफ बागवान हे त्यांची आई नाजीया, वडील आसिफ, भाऊ मतिन व बहीण आयेशा असे एकत्रात आहे. फिर्यादी यांच्या वाडयात महेबुब हमीद बागवान व मुसा गुलाब बागवान हे देखील राहण्यास आहेत.

दिनांक ०५/१०/२०१९ रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास ते सर्व जण जेवण करुन झोपी गेले व ते झोपेत असताना अचानक फिर्यादी यांना त्यांच्या आईचा ओरडण्याचा आवाज आला, त्यामुळे ते जागे झाले. दिनांक ०६/१०/२०१९ रोजी पहाटे ०३.०० वाजण्याच्या सुमारास उठुन फिर्यादीने त्यांच्या आईकडे काय झाले याबाबत विचारपुस केली असता त्यांच्या आईने सांगितले की आपल्या घरातील कपाट व घराचा दरवाजा उघडा दिसत आहे. त्यामुळे त्यांनी घर तपासुन पाहिले असता त्यांना घरातील तीन मोबाईल नसल्याचे दिसले व कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडल्याचे दिसले. त्यांनी कपाटात ठेवलेले अंदाजे ३,०००/- रुपये रोख रक्कम देखील त्यांना दिसुन आली नाही. त्यामुळे ते घराबाहेर येऊन त्यांनी बघितले असता त्यांच्या वाडयातील सर्व लोक जागे झाल्याचे त्यांना दिसले. त्यापैकी महेमुद हमीद बागवान व मुसा गुलाब बागवान यांचे देखील घराचा कडी कोयंडा उचकटुन चोरी झाल्याचे त्यांनी फिर्यादीला सांगितले. फिर्यादी यांच्या घरातील एकुण रोख रक्कम रु.११,५००/- किंमतीचा ऐवज, महेमुद हमीद बागवान यांचा एकुण रक्कम रु.४६,०००/- रुपयांचा ऐवज व मुसा गुलाब बागवान यांचा एकुण रक्कम रु.१०,०००/- किंमतीचा वर्णनाचा ऐवज असे एकुण खालील वर्णनाचे एकुण रक्कम रु.६७,५००/- किंमतीचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी व साक्षीदार यांच्या संमतीशिवाय मुद्दाम लबाडीने चोरुन नेल्याने फिर्यादीने घटनेविषयी अज्ञात चोरटयांविरुध्द बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे फिर्याद नोंदविली.

| अ.क्र. | रक्कम | चोरीला गेलेल्या मालाचे वर्णन |
|---|---|---|
| १) | ५,०००/- | एक रेटमी नोट कंपनीचा 7S मॉडेलचा निळया रंगाचा त्यात ९०९६३१४१८८ व ७९७२०९२७७४ असे सीमकार्ड असलेला मोबाईल |
| २) | ३,०००/- | एक सॅमसंग कंपनीचा J2 मॉडेलचा गोल्डन रंगाचा त्यात ९३७३५६५८२१ असे सीमकार्ड असलेला मोबाईल |
| ३) | ५००/- | एक सॅमसंग कंपनीचा गुरु मॉडेलचा काळया रंगाचा त्यात ७२६४८८१८६६ असे सीमकार्ड असलेला मोबाईल |
| ४) | ३,०००/- | रोख रक्कम त्यात १००, ५०, २० रु दराच्या अंदाजे नोटा |
| ५) | १२,०००/- | एक सॅमसंग कंपनीचा C5 मॉडेलचा सिल्व्हर रंगाचा त्यात ९९२२०२०००४ व ७५८८२२०००४ असे सीमकार्ड असलेला मोबाईल |
| ६) | १५,०००/- | एक सॅमसंग कंपनीचा A7 मॉडेलचा गोल्डन रंगाचा त्यात ९९२३८२०००४ असे सीमकार्ड असलेला मोबाईल |
| ७) | ७,०००/- | एक सॅमसंग कंपनीचा J7 मॉडेलचा गोल्डन रंगाचा त्यात ९२८४१८४७४३ असे सीमकार्ड असलेला मोबाईल |
| ८) | ८,०००/- | एक रेडमी कंपनीचा नोट ७ प्रो मॉडेलचा लाल रंगाचा त्यात ९०२२५४९५८९ व ८३७९८६९३२९ असे सीमकार्ड असलेला मोबाईल |
| ९) | ४,०००/- | रोख रक्कम त्यात २०००, ५०० व १०० रु दराच्या नोटा |
| १०) | ००.००/- | मॅस्ट्रो कंपनीच्या टु व्हीलरची चावी |
| ११) | ३,०००/- | एक सॅमसंग कंपनीचा J7 मॉडेलचा गोल्डन रंगाचा त्यात ९०२१९३९३७८ असे सीमकार्ड असलेला मोबाईल |
| १२) | ७,०००/- | रोख रक्कम त्यात ५००, १०० व ५० रु दराच्या नोटा |

**०३]** गुन्हयाची नोंद झाल्यानंतर तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री.पी.बी. केदार, बार्शी शहर पोलीस स्टेशन यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, मुद्देमाल जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपास पुर्ण झाल्यानंतर ठाणे अंमलदार, बार्शी यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४]** माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपी क्र.१ विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४५७ व ३८० सह कलम ३४ अन्वये दोषारोप निशाणी क्र.१५ वर ठेवले, ते त्यांना वाचुन व समजावुन सांगितले ते त्यांनी नाकबुल करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा आल्यामुळे आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे जबाब निशाणी क्र.४० वर नोंदविला. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या विरोधातील सर्व कथने नाकारुन आरोपी हा पारधी समाजाचा आहे, पारधी लोक गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतात या वहमापोटी पोलिसांचे सांगणेवरुन त्यांच्याविरुध्द खोटी केस केल्याचे कथन केले आहे.

**०५]** खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले व त्यावर मी खालील प्रमाणे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०५/१०/२०१९ रोजी रात्री ११.३० पासुन ते दिनांक ०६/१०/२०१९ रोजीचे पहाटेचे ०३.०० वाजणेचे दरम्यान आरोपी क्र.१ ने विधीसंघर्ष बालक व फरारी आरोपी क्र.३ यांच्याशी संगनमत करुन, शेटेवाडा, सोमवार पेठ, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर येथील फिर्यादी व साक्षीदारांच्या घरात रात्रीच्या वेळेस त्यांच्या घराचे कडी कोयंडे उचकटुन त्यांच्या घरात चोरटे गृह अतिक्रमण केले आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानाचे कलम **४५७ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | काय ? | |
| २. | वर नमूद कालावधीत व ठिकाणी, आरोपी क्र.१ ने विधीसंघर्ष बालक व फरारी आरोपी क्र.३ यांच्याशी संगनमत करुन, फिर्यादी व साक्षीदार यांच्या घरात प्रवेश करुन त्यांच्या घरातील मोबाईल, रोख रक्कम व मेस्ट्रो कंपनीच्या दुचाकी वाहनाची चावी चोरुन नेली व त्याद्वारे भारतीय दंड विधानाचे कलम **३८० सहकलम ३४** अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी |
| ३. | काय हुकूम व आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## :: कारणमिमांसा ::

**०६]** आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने उपरोक्त नमुद भाग 'क' प्रमाणे एकुण ०७ साक्षीदार तपासले.

**०७]** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा खटला हा एकुण ०७ महत्वाचे साक्षीदार तपासुन सिध्द केलेला आहे. चोरी गेलेला मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे. त्याबाबत जप्ती पंचनामा अभिलेखावर दाखल आहे. सबब, आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द झाल्याने त्यास शिक्षा करण्याबाबत मागणी केली आहे.

**०८]** उलटपक्षी आरोपींच्या विधीज्ञांच्या युक्तीवादानुसार अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द केलेला नाही. जप्ती पंचनामा हा पंच साक्षीदारांच्या पुराव्यातुन सिध्द झालेला नाही. तसेच तपासी अंमलदार यांचा पुरावा अभिलेखावर नोंदविलेला नसुन पंचनामा त्यांच्या पुराव्यातुन सिध्द झालेला नाही. आरोपीने प्रस्तुतचा गुन्हा केला याबाबतचा कोणताच सबळ पुरावा

अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. सबब, आरोपीस निर्दोष मुक्त करण्याची मागणी त्यांनी केली.

**०९]** अभियोग पक्षाच्या कथनानुसार, दिनांक ०५/१०/२०१९ रोजी रात्री ११.३० पासुन ते दिनांक ०६/१०/२०१९ रोजी पहाटे ०३.०० वाजण्याच्या दरम्यान आरोपीने एकत्रित राहणा-या वाडयात प्रवेश करुन फिर्यादी व साक्षीदार महेमुद बागवान व मुसा बागवान यांच्या घराच्या दरवाजाचे कडी कोयंडे उचकटुन घरामध्ये प्रवेश करुन मोबाईल व रोख रक्कम असे एकुण रु.६७,५००/- किंमतीचा ऐवज चोरी केले आहे.

**<u>मुद्दा क्र.१ व २ बाबतः-</u>**

**१०]** सदरचे मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे ते मी माझे विचारार्थ कारणमिमांसेकरीता एकत्र घेतले आहेत.

**११]** आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांतर्गत अभियोग पक्षाने, अभिलेखावर फिर्यादी मोबीन बागवान यांचा पुरावा साक्षीदार क्र.१ म्हणुन (निशाणी क्र.१८) नोंदविला आहे. फिर्यादी यांच्या पुराव्यानुसार, ते आरोपी गुणवंत पवार यांना ओळखतात, घटना दिनांक ०६/१०/२०१९ रोजी रात्री अडीच ते तीन वाजताच्या सुमारास त्यांच्या घरी घडली आहे, त्यांच्या घराची लाईट चालु होती व घरातील कपाटे विस्कटलेली होती व त्यांची आई जागी झालेली होती, त्यांच्या आईने आरडाओरड करुन त्यांना उठविले, फिर्यादी यांना कळले की मोबाईल वगैरे नाही व खिशातील पैसेही नाहीत, त्यांच्या घरातील तीन मोबाईल ते मोबाईल रेडमी नोट ७एस, सॅमसंग जी टु आणि सॅमसंग गुरु नव्हते तसेच खिशात ठेवलेली रोख रक्कम रु.३,०००/- ही नव्हती, त्यांच्या घरामध्ये चोरी झाली होती व त्यांच्या घराशेजारील दोन घरांमध्येही घरफोडी झाली होती, ती घरे महेबुब बागवान व मुसा बागवान यांची आहेत, त्या दोघांच्या घरामधुन मोबाईल चोरीला गेले होते, त्यानंतर ते सर्व मिळुन पोलीस स्टेशनला

गेले व त्यांनी घटनेबाबत फिर्याद (निशाणी क्र.१९) दिली. फिर्यादीच्या पुराव्यानुसार ज्या इसमाने चोरी केली त्यास बघितल्यास ते ओळखु शकतात.

**१२]** फिर्यादीच्या पुराव्यानुसार घटनेच्या दिवशी त्यांना त्यांच्या आईचा ओरडण्याचा आवाज आल्याने ते झोपेतुन उठले व त्यांना घटनेबाबत कळाले आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये फिर्यादीच्या आई नाजीया आसिफ बागवान (साक्षीदार क्र.२, निशाणी क्र.३०) यांचा पुरावा याठिकाणी महत्वाचा आहे. फिर्यादी यांच्या आईच्या पुराव्यानुसार, घटना दिनांक ०६/१०/२०१९ रोजी पहाटे तीन वाजताच्या दरम्यान घडली आहे. त्यांना आवाज आल्याने त्या जागे झाल्या तेव्हा त्यांनी सर्व बघितले, त्यांनी आरोपींना त्यांच्या वाडयामध्ये बाहेर बघितले, आरोपींनी कपाट उघडुन मोबाईल, पैसे घेतल्याचे त्या कथन करतात. त्यानंतर त्या जोराने ओरडल्यानंतर त्यांच्या वाडयातील सर्व लोक जागे झाले, तेव्हा त्यांचा मुलगा पळायला लागला तेव्हा त्यांनी पाठीमागे जाऊ नको असे त्यास सांगितले. साक्षीदाराने न्यायालयामध्ये हजर आरोपीस ओळखले आहे.

**१३]** प्रस्तुतच्या साक्षीदाराच्या पुराव्यानुसार त्यांनी संपुर्ण घटना बघितलेली आहे व त्यांनी आरोपीला त्यांच्या वाडयामध्ये बाहेरच्या बाजुस बघितलेले आहे. प्रस्तुतच्या साक्षीदाराने त्यांना विचारलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी आरोपीला पहिल्यांदाचा न्यायालयामध्ये बघितलेले आहे व आरोपीचे नाव त्यांना पोलिसांनी सांगितल्याचे मान्य केले आहे.

**१४]** प्रकरणामध्ये तपासी अंमलदार यांनी साक्षीदार क्र.२ नाजीया यांचे तपास टिपण फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १६१ नुसार नोंदविलेले आहे. त्यांच्या तपास टिपणाप्रमाणे प्रस्तुतच्या साक्षीदाराने त्यांनी आरोपीला त्यांच्या वाडयामध्ये बाहेर बघितल्याचे कोठेही कथन केलेले नाही. एवढेच नव्हेतर, प्रस्तुतच्या साक्षीदाराच्या तपास टिपणाचे अवलोकन केले असता, त्या

रात्री झोपेतुन उठल्या असता त्यांना घरातील लोखंडी कपाट व दरवाजा उघडा दिसल्याने त्यांना घरामध्ये कोणीतरी दिसल्याचा संशय आल्याने त्यांनी आरडाओरडा करण्यास सुरुवात केली व त्यांचा आवाज ऐकुन घरा शेजारी राहणारे लोक जमा झाले व घरात चोरी झाल्याचा संशय त्यांना वाटु लागल्याने त्यांनी घरामध्ये येऊन बघितले असता त्यांना घरातील मोबाईल चोरीला गेल्याचे त्यांनी नमुद केले आहे. अशा प्रकारे साक्षीदाराचे तपास टिपण व त्यांचा पुरावा यामध्ये कमालीचा विरोधाभास आहे. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावर उपस्थित होता व साक्षीदाराने आरोपीस बघितले ही बाब त्यांनी कोठेही तपासा दरम्यान सांगितलेली नाही. परंतु पुराव्या दरम्यान त्यांनी आरोपीस त्यांच्या वाडयात बघितल्याचे ते कथन करतात. अशा परिस्थितीमध्ये साक्षीदाराचा पुरावा यामध्ये तफावत दिसुन येत आहे.

**१५]** प्रस्तुतची घटना ही फिर्यादी यांच्या व्यतिरिक्त मुसा गुलाब बागवान (साक्षीदार क्र.३, निशाणी क्र.३१) व महेमुब हमीद बागवान (साक्षीदार क्र.४, निशाणी क्र.३२) यांच्या सोबत घडलेली असुन त्यांच्या घरातीलही मोबाईल व रोख रक्कम चोरी गेल्याचे त्यांचे कथन आहे. अशा परिस्थितीमध्ये वरील दोन्ही साक्षीदारांचा पुरावा महत्वाचा आहे. साक्षीदार क्र.३ मुसा यांच्या पुराव्यानुसा घटनेच्या दिवशी रात्री ०३.०० च्या दरम्यान त्यांच्या शेजारील लोकांचा आवाज ऐकु आल्याने त्यांनी उठुन बघितले असता त्यांच्या शेजारील लोकांच्या घराचा कोयंडा तुटलेला होता, आत जाऊन बघितले असता घरातील कपाट उघडलेले होते, त्यांच्या शेजारच्यांनी त्यांना सांगितले की चोर आला होता, तेव्हा साक्षीदाराने विचारले की कोठे आहे व ते बाहेर आले, तेव्हा त्यांना चोर पळताना दिसला, त्या दोघा तिघांनी चोराचा पाठलाग केला, परंतु आरोपी त्यांना सापडला नाही तो गायब झाला, नंतर त्यांनी पोलीस स्टेशनला जाऊन घटनेबाबत तक्रार दिली. साक्षीदाराने न्यायालयामध्ये हजर आरोपीस पुराव्या दरम्यान ओळखले आहे.

**१६]** प्रस्तुत साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, प्रस्तुतच्या साक्षीदाराने त्याच्या घरामधुन ऐवज चोरीला गेला याबाबत काहीही कथन केलेले नाही. परंतु फिर्याद (निशाणी क्र.१९) व फिर्यादीचा पुरावा यावरुन प्रस्तुतच्या साक्षीदाराच्या घरातुनही आरोपीने मोबाईल चोरुन नेल्याचे कथन केले आहे. महत्वाची बाब म्हणजे प्रस्तुतच्या साक्षीदारानेही ते घराबाहेर आले असता त्यांना चोर पळताना दिसला व त्यांनी त्याचा पाठलाग केला. तसेच न्यायालयामध्ये हजर आरोपीस ओळखले आहे. साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये त्यांना आरडाओरडा ऐकु आल्यानंतर ते बाहेर आले व त्यापुर्वी काय घडले नसुन त्यांनी आरोपीला पकडले ही बाब अमान्य केली आहे. तपासी अंमलदार यांनी साक्षीदाराच्या नोंदविलेल्या तपास टिपणाचे अवलोकन केले असता त्यामध्येही साक्षीदाराने कोठेही त्यांनी आरोपीस पळताना बघितले व आरोपीचा पाठलाग केला किंवा घटनेच्या वेळी आरोपीस घटनास्थळावर बघितले याबाबत तपास टिपणामध्ये काहीही कथन केलेले नाही व त्यांना शेजारील लोकांचा आरडाओरडा आल्यानंतर ते घराबाहेर आल्यानंतर त्यांना त्यांचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल तसेच रोख रक्कम चोरीला गेल्याचे त्यांना कळाल्याचे दिसुन येत आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुतच्या साक्षीदाराचा पुरावा अतिशय विरोधाभासी दिसुन येत आहे व तो फिर्यादी यांच्या पुराव्यास पुरक नाही.

**१७]** साक्षीदार क्र.४ महेबुब बागवान यांच्या पुराव्यानुसार, घटनेच्या दिवशी पहाटे तीन ते सव्वातीन च्या दरम्यान त्यांना ओरडण्याचा आवाज ऐकुन आल्याने ते दचकुन उठले असता त्यांना त्यांच्या घरातील कडी कोयंडा तुटलेला दिसला व त्यांना त्यांच्या घरातील लाईट चालु असलेले दिसले व त्यांच्या दारातुन एक १६ ते १७ वर्षांचा इसम पळत जाताना दिसला, त्याच्या हातामध्ये लोखंडी काहीतरी रॉड असल्याचे ते कथन करतात व त्यांनी बाहेर येऊन बघितले असता त्याठिकाणी बाहेर एक इसम हजर असल्याचे दिसले, तो साधारण ४० ते ४५ वर्षांचा होता, नंतर ते दोघेही मंडईच्या दिशेने पळत गेल्याचे

त्यांनी बघितले, वाडयातील सर्व लोक जागे झाल्यानंतर त्यांनी आरोपींचा शोध घेतला परंतु त्यांना काही दिसुन आले नाही, त्यानंतर ते पोलीस स्टेशनला गेले, त्यांची रक्कम रु.४,०००/- व चार मोबाईल चोरीला गेले, पोलिसांनी चोरीला गेलेल्या मोबाईल नंबरवर फोन केला असता तो नंबर चालु होता, समोरच्याने फोन उचलला व शिवीगाळ केली व समोरचा व्यक्ती म्हणाला मी मोबाईल चोरलेला आहे, मला पोलीस पकडु शकत नाही, माझे कोणी काही करु शकत नाही, त्यानंतर पहाटे चार वाजताच्या सुमारास त्यांनी फिर्याद दिली व पुढे पोलिसांनी लोकेशननुसार कारवाई केली. प्रस्तुतच्या साक्षीदाराने न्यायालयामध्ये हजर आरोपीस ओळखले आहे. प्रस्तुतच्या साक्षीदारानेही त्याच्या उलटतपासामध्ये आरडाओरड झाल्यानंतर ते घटनास्थळी गेले व त्यांनी स्वतः आरोपीला पकडले नसल्याचे मान्य केले आहे. प्रस्तुतच्या साक्षीदारानेही तपासादरम्यान घटनास्थळावर त्यांनी दोन आरोपी बघितले होते, त्यातील एकाच्या हातात रॉड होता याबाबी कथन केलेल्या नाहीत. एवढेच नव्हेतर, पोलीस स्टेशनला गेल्यानंतर चोरीला गेलेल्या मोबाईल नंबरवर फोन केला व पुढे पोलिसांनी लोकेशननुसार आरोपींविरुध्द कारवाई केली याबाबीही प्रस्तुतच्या साक्षीदाराने तपासा दरम्यान कोठेही सांगितल्या नाहीत. प्रस्तुतच्या साक्षीदाराचा पुरावा हा त्यांनी पोलिसांवर दिलेल्या जबाबाच्या एकदम विरोधाभासी असुन इतर साक्षीदारांच्या पुराव्यासही प्रस्तुतच्या साक्षीदाराचा पुरावा पुरक नाही.

**१८]** अभियोग पक्षाने प्रकरणामध्ये साक्षीदार क्र.५ सद्दाम, साक्षीदार क्र.६ मनोज व साक्षीदार क्र.७ उमाकांत या तिन्ही साक्षीदारांचा पुरावा नोंदविलेला आहे. प्रस्तुतचे तिन्ही साक्षीदारांची साक्ष ही ऐकीव माहितीवर अवलंबुन आहे. साक्षीदार क्र.५ यांच्या पुराव्यानुसार त्यांना नाजीया बागवान यांचा आवाज आल्याने ते उठले व बघितले असता चोरी झाल्याचे त्यांना कळले नंतर त्यांना मुन्ना बागवान व मुसा बागवान यांच्या घरीही चोरी झाल्याचे कळले, ज्या व्यक्तीने चोरी केली त्याचे नाव गुणवंत पवार असल्याचे सांगुन न्यायालयात

हजर आरोपीस साक्षीदाराने ओळखले. उलटतपासामध्ये प्रस्तुतच्या साक्षीदाराने आरोपीचे नाव हे त्यांना पोलिसांनी सांगितले असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तसेच त्यांनी आरोपीला पहिल्यांदा पोलीस स्टेशनला बघितले असल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

१९] साक्षीदार क्र.६ मनोज यांच्या पुराव्यानुसार त्यांच्या ओरडण्याचा आवाज ऐकु आल्यानंतर ते बाहेर आले असता त्यांना चोरी झाल्याचे कळाले, त्यांनी दरवाजा उघडला असता त्यांना तीन व्यक्ती दिसले, साक्षीदार यांनी त्यांचा पाठलाग केला असता ते यशवंत सभागृहाच्या भिंतीवरुन उडी मारुन मंडईच्या दिशेने पळुन गेले. साक्षीदाराने न्यायालयामध्ये हजर आरोपीस ओळखले. प्रस्तुतच्या साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये चोर त्यांना सापडले नाही व चोरांची नावे त्यांना पोलिसांनी सांगितली व आरोपींना ते आज पहिल्यांदार बघत असल्याचे मान्य केले आहे.

२०] साक्षीदार क्र.७ उमाकांत यांच्या पुराव्यानुसार, त्यांना शेजारील बाईचा ओरडण्याचा आवाज ऐकल्याने ते उठले व त्यांनी लाईट चालु केले, तेव्हा त्यांना चोर समोर दिसले, ते तिघे होते, साक्षीदाराने लाईट लावले तेव्हा ते पळुन गेले, ते यशवंतराव सभागृहाच्या भिंतीवरुन उडी मारुन पळुन गेले. साक्षीदाराने न्यायालयात हजर असलेल्या आरोपीस ओळखले. उलटतपासादरम्यान प्रस्तुतच्या साक्षीदाराने आज पहिल्यांदाच आरोपीला न्यायालयात बघितल्याचे मान्य केले आहे.

२१] अभियोग पक्षाच्या कथनानुसार, घटनेच्या दिवशी आवाज झाल्याने फिर्यादी व साक्षीदार जागे झाले तेव्हा त्यांना त्यांच्या घरातील रोख रक्कम व मोबाईल चोरीला गेल्याचे कळाले व तदनंतर त्याबाबत त्यांनी घटनेबाबत अज्ञात इसमांविरुध्द फिर्याद दिली. अभियोग पक्षाच्या कथनानुसार घटनेच्या वेळी घटनास्थळावर आरोपी उपस्थित होते किंवा साक्षीदारांनी

आरोपींना घटनास्थळावर बघितले याबाबत त्यांनी कोठेही वाच्यता केलेली नाही. अभिलेखावर आलेल्या काही साक्षीदारांच्या पुराव्यानुसार त्यांनी घटनास्थळावर काही लोकांना बघितले व त्यानंतर वाडयातील सर्व लोक जमा झाल्यानंतर ते इसम त्या ठिकाणाहुन पळुन गेले. अभियोग पक्षाने त्यांची फिर्याद (निशाणी क्र.१९) अथवा साक्षीदारांच्या तपास टिपणामध्ये आरोपी घटनास्थळावर मिळुन आले किंवा ते घटनास्थळावरुन पळुन गेले अथवा साक्षीदारांनी आरोपीस घटनास्थळावर बघितले याबाबत कोणताच पुरावा त्यांनी अभिलेखावर दिलेला नाही. आरोपींची घटनास्थळावरील घटनेच्या वेळची उपस्थिती व सदरील उपस्थिती ही साक्षीदारांनी स्वतः बघितली याबाबत फिर्याद तसेच साक्षीदारांचे तपास टिपण यामध्ये कोणताही मजकुर नमुद नाही.

**२२]** अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता जप्ती पंचनामा हा दिनांक ०८/१०/२०१९ रोजी दोन पंचांसमक्ष नोंदविलेला असुन सदरील पंचनाम्याद्वारे आरोपींच्या ताब्यातुन एकुण नऊ ऐवज जप्त करण्यात आलेले आहेत. आरोपीविरुध्दचा दोषारोप हा चोरी संदर्भात असल्याने घटनेच्यावेळी किंवा तदनंतर आरोपीच्या ताब्यातुन चोरीच्या वस्तु बाळगुन आल्या ही बाब सिध्द करण्यासाठी जप्ती पंचनामा संशयापलीकडे सिध्द होणे अतिशय महत्वाची आहे. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये तपासी अंमलदार यांच्याद्वारे जप्ती पंचनामा करुन आरोपींनी स्वतः गुन्हयात चोरी केलेले मोबाईल काढुन दिल्याचे पंचनाम्यामध्ये नमुद आहे. परंतु त्या संदर्भामध्ये आरोपीचा निवेदन पंचनामा नोंदविल्याचे दिसुन येत नाही. प्रस्तुतचा जप्ती पंचनामा हा स्वतंत्र साक्षीदारांच्या पुराव्यातुन अथवा तपासी अंमलदार यांच्या पुराव्यातुन सिध्द होणे गरजेचे आहे. परंतु प्रकरणामध्ये पंच साक्षीदार अथवा तपासी अंमलदार यांचा पुरावा अभिलेखावर आलेला नसुन त्यांच्या पुराव्यातुन प्रस्तुतचा जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. अशा परिस्थितीमध्ये आरोपीच्या ताब्यातुन चोरीचा मुद्देमाल हा जप्ती पंचनाम्याद्वारे जप्त केला ही बाब सबळ पुराव्यानिशी संशयापलीकडे सिध्द झालेली नाही. अभिलेखावर आलेला फिर्यादीच्या

पुराव्यानुसार घटना घडल्यानंतर आरोपी हे घटनास्थळावर उपस्थित होते याबाबत त्यांनी काहीही कथन केलेले नाही परंतु इतर साक्षीदार घटनास्थळावर आरोपींची उपस्थितीबाबत सांगत आहेत. प्रस्तुतच्या साक्षीदारांचा पुरावा हा फिर्यादी यांच्या पुराव्यास पुष्टी देणारा तसेच तपासी अंमलदार यांनी नोंदविलेले त्यांचे जबाब यालाही तो विरोधाभासी आहे. एवढेच नव्हेतर साक्षीदारांनी त्यांच्या उलटतपासात आरोपीला त्यांनी आज पहिल्यांदाच न्यायालयात बघितले असल्याचे मान्य केले आहे. महत्वाची बाब म्हणजे तपासी अंमलदार यांनी आरोपींची ओळख परेडही नोंदविल्याचे दिसुन येत नाही. अशा सर्व परिस्थितीमध्ये आरोपींची घटनास्थळावरील उपस्थिती व त्यांच्या ताब्यातुन चोरीला गेलेला मुद्देमाल जप्त केला ही बाब संशयापलीकडे सिध्द झालेली नाही. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द होण्यासाठी प्रकरणामध्ये जप्ती पंचनामा पंच साक्षीदार अथवा तपासी अंमलदार यांच्या पुराव्यातुन सिध्द होणे गरजेचे आहे. परंतु तो साक्षीदारांच्या पुराव्यातुन सिध्द झालेला नाही. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा त्यांचा खटला संशयापलीकडे जाऊन सिध्द करणे गरजेचे आहे. परंतु अभिलेखावर आलेल्या तोंडी पुराव्यावरुन तसेच साक्षीदारांच्या तपास टिपणांवरुन घटनेबाबत संशय निर्माण होत असुन त्याचा फायदा आरोपीस देणे न्यायाचित होईल.

**२३]** आरोपी क्र.३ उमेश प्रकाश काळे यांच्याविरुध्द दोषारोपपत्र फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ अन्व्ये दाखल केलेले आहे. सदर आरोपीस वारंवार बिनजमानती अधिपत्र काढुन देखील अभियोग पक्षास त्यांना हजर ठेवता आले नाही. त्यामुळे सदरचे प्रकरण त्यांच्याविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे चालविण्यात आले. परंतु एकंदरीत उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले आरोपी क्र.३ हे भविष्यात हजर झाले व हेच पुरावे त्यांच्याविरुध्द वाचले तर त्यांच्याविरुध्द दोषारोप सिध्द होणार नाही. त्यामुळे हे प्रकरण आरोपी क्र.३ करीता जिवंत ठेवणे योग्य राहणार नाही. आरोपी क्र.३ विरुध्द दोषारोप ठेवण्यात आला नाही. प्रकरण हे ०६ वर्षे जुने असल्याने व

आरोपी क्र.३ यांच्याविरुध्द फिर्यादी व साक्षीदार यांच्या पुराव्यातुन दोषारोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ पुरावा मिळुन न आल्याने आरोपी क्र.३ यांना वरील नमुद गुन्हयातुन दोषमुक्त करणे योग्य राहील. सबब, मी मुद्दा क्र.१ व २ ला नकारार्थी उत्तर नोंदविते.

**<u>मुद्दा क्र.३ बाबतः-</u>**

**२४]** प्रस्तुत प्रकरणात दोषारोप पत्र आरोपींविरुध्द दाखल करण्यात आलेले असून आरोपींविरुध्द गुन्हा संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. अभिलेखावर तपासण्यात आलेल्या फिर्यादी व साक्षीदारांचा पुरावा एकमेकांशी सुसंगत नाही. जप्ती पंचनामा संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. त्यामुळे आरोपी यांनी गुन्हा केला आहे हे अभियोग पक्ष निःसंशयरित्या सिध्द करु शकलेला नाही असे म्हणणे भाग आहे. त्यामुळे आरोपी क्र.१ हे निर्दोष मुक्त होण्यास तसेच आरोपी क्र.३ दोषमुक्त होण्यास पात्र राहील. त्यामुळे आरोपी क्र.१ यांच्या कडून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये रक्कम रुपये १५,०००/- चा जामीन घेण्यात आला. सबब, मुद्दा क्र.३ च्या निष्कर्षादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.**१) गुणवंत सुरेश पवार,** यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ४५७ व ३८० सह कलम ३४ च्या शिक्षापात्र गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी क्र.**३) उमेश प्रकाश काळे** यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३९ अन्वये डिस्चार्ज करण्यात येते.

३. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे रुपये १५,०००/- चे बंधपत्र दयावे.

५. १) एक सॅमसंग कंपनीचा A7 मॉडेलचा मोबाईल, २) एक सॅमसंग कंपनीचा C5 मॉडेलचा मोबाईल, ३) एक रेडमी कंपनीचा नोट 7 प्रो मॉडेलचा मोबाईल, ४) एक सॅमसंग कंपनीचा J7 मॉडेलचा मोबाईल, ५) एक रेडमी नोट कंपनीचा 7S मॉडेलचा मोबाईल, ६) एक सॅमसंग कंपनीचा J2 मॉडेलचा मोबाईल, ७) एक सॅमसंग कंपनीचा J7 मॉडेलचा मोबाईल, ८) एक सॅमसंग कंपनीचा गुरु मॉडेलचा मोबाईल, हे अपील कालावधी संपल्यानंतर त्यांच्या मुळ मालकाच्या ताब्यात देण्यात यावे.

६. एक पांढ-या रंगाची होंडा अमेझ कंपनीची चारचाकी गाडी जिचा नं.MH-42/AS-0080 ही अपील कालावधी संपल्यानंतर इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास तिच्या मुळ मालकाच्या ताब्यात देण्यात यावी.

७. एक काळया रंगाची होंडा युनिकॉर्न कंपनीची मोटार सायकल जिचा नं.MH-13/CZ-9265 ही अपील कालावधी संपल्यानंतर इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास तिच्या मुळ मालकाच्या ताब्यात देण्यात यावी.

८. या न्यायनिर्णयाची प्रत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३६५ प्रमाणे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित व टंकलिखित करण्यात आला.)

PADMASHRI VASANT RAUT

Digitally signed by PADMASHRI VASANT RAUT
Date: 2026.05.11 17:41:44 +0530

बार्शी.
दिनांकः ११/०५/२०२६

**(श्रीमती पी.व्ही. राऊत)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बार्शी.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri.S.R. Barangule |
| (b) | Court | : | Smt. P.V. Raut,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 11/05/2026 |
| (d) | Judgment /Order checked on | : | 11/05/2026 |
| (e) | Judgment /Order signed by P.O. on | : | 11/05/2026 |
| (f) | Judgment /Order uploaded on | : | 11/05/2026 |